**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृह निर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**
**फोन नं. ०२२-६६४० ५१५७ / ५१४८,** **ई - मेल आयडी :-** skarad@mhada.gov.in
**संदर्भ क्र. मा. व सं. तं. कक्ष -१/ ई-निविदा / ०२ / २०२०** **दिनांक : ३१/०१/२०२०**

**कामाचे नाव**- म्हाडाकरीता लॅपटॉपचा पुरवठा करणेबाबत.

## ई- निविदा सूचना

मुख्य आयसीटी अधिकारी/आयसीटी कक्ष/म्हाडा, १ ला मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याद्वारे वस्तू व सेवा कर नोंदणीकृत प्रमाणपत्र प्राप्त अधिकृत वितरक असलेल्या प्राधिकृत विक्रेते/व्यावसायिक भागीदार यांच्याकडून वरील नमूद कामांकरिता डिजिटल स्वरूपात स्वाक्षरीकृत व अटीविरहित ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशील | निविदा प्रपत्राची किंमत (रू.) | इ.र.ठे.(रू.) | कामाचा पूर्तता कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | म्हाडाकरीता लॅपटॉपचा पुरवठा करणेबाबत. | रू.१,१२०/- (GST सहित) | रू.५,०००/- | १२० दिवस |

१. संपूर्ण बोली प्रक्रिया हि निविदा कागदपत्रांनुसार दुहेरी बोली पद्धतीत म्हणजेच स्वतंत्रपणे (i) तांत्रिक व (ii) वित्तीय बोली याप्रमाणे ऑनलाईन (ई-निविदा) होईल. सदर निविदा सूचनेच्या संदर्भातील सर्व अधिसूचना आणि सविस्तर अटी व शर्ती यापुढे वेबसाईट https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन प्रसिध्द केल्या जातील.

२. बोली दस्तावेज वेबसाईट https://mahatenders.gov.in वरून दि.३१/०१/२०२० रोजी दुपारी ०२:०० वा. ते दि.२४/०२/२०२० रोजी संध्या. ०६:०० वा. पर्यंत डाऊनलोड करता येतील.

३. रु.१,१२०/- (रु. एक हजार एकशे वीस फक्त) नापरतावायोग्य निविदा प्रपत्र शुल्क आणि रु.५,०००/- (रू. पाच हजार फक्त) ची इ.र.ठे. ऑनलाईन द्वारा प्रदान करावी. वाणिज्य बोलीबाबत निर्णय घेतल्यानंतरच सर्व अयशस्वी बोलीदारांची इ.र.ठे. परत दिली जाईल. यशस्वी बोलीदारांची इ.र.ठे. कराराच्या पूर्ततेपश्चात परत करण्यात येईल.

४. इच्छुक बोलीदारांनी, इच्छा असल्यास, आपले दर उद्धृत करण्यापूर्वी साइटला भेट द्यावी. कोणतेही ऑनलाईन प्रदान करण्यापूर्वी कृपया https://mahatenders.gov.in वेबसाइटवर दिलेल्या सूचना, ऑनलाईन पेमेण्टसंदर्भात टॉपवर स्क्रोल करुन वाचाव्यात.

५. पुढीलप्रमाणे इ.र.ठे. खालील बाबींमध्ये जप्त करण्यात येईल :
अ) बोली वैधतेच्या मुदतीत जर बोलीदाराने त्याची बोली वैधता कालावधीमध्ये मागे घेतल्यास.
ब) यशस्वी बोलीदाराच्या बाबतीत, बोलीदाराने कंत्राटावर स्वाक्षरी न केल्यास.

६. कोणत्याही एजन्सीला इ.र.ठे.च्या प्रदानातून सवलत देण्यात येणार नाही.

७. तांत्रिक बोली दि.२५/०२/२०२० रोजी सकाळी ११:३० वा. मुख्य मा.व.सं.तं. अधिकारी यांचे कार्यालय, मा.व.सं.तं.कक्ष/म्हाडा, १ ला मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्या कार्यालयामध्ये वेबसाईट https://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.

८. तांत्रिक बोली उघडण्याच्या वेळेस पडताळणीकरिता निविदाकारांनी मूळ दस्तावेज (जे बोली तयार करताना अपलोड केलेले होते) सादर करावेत.

९. बोलीदारांनी तांत्रिक प्रस्तावात नमूद केल्यानुसार तांत्रिक लिफाफ्यांमध्ये पीडीएफ/*.rar प्रकारातून माहिती व स्कॅन केलेल्या प्रती सादर कराव्यात.

१०. पात्र बोलीदारांना व्यावसायिक बोलीच्या उघडण्याची तारीख व वेळेची माहिती दिली जाईल.

११. बोलीदारांना कोणत्याही प्रमाणित संस्थेकडून वैध वर्ग २/३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (डीएससी) निविदाकाराकडे असावे.

१२. मुख्य आयसीटी अधिकारी, आयसीटी कक्ष/म्हाडा, १ ला मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ हे कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व निविदा स्वीकारणे वा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

१३. निविदा दस्तावेज डाऊनलोड करणे व बोली ऑनलाईन करणे यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे वेबसाईट https://mahatenders.gov.in वरून डाऊनलोड करता येऊ शकतील.

१४. म्हाडाकडून कोणतीही वाढीव किंमत अदा केली जाणार नाही. (No Price escalation will be paid by MHADA).

**सहाय्यासाठी हेल्पलाइन : ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२,**
**०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७**
**ई-मेल आयडी - support-eproc@nic.in**

मुख्य मा. व सं. तं. अधिकारी
मा. व. सं. तं. कक्ष / म्हाडा